MAH/MUL/ 03051/2012 2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता

July To Sept. 2020
Issue-35, Vol-08

Date of Publication
01 Sept. 2020

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned by CamScanner

Date of Publication
01 Sept. 2020

Vidyawarta™
International Multilingual Research Journal

www. विद्यावार्ता .कॉम ®
YouTube Channel

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***

Indexed

IMPACT FACTOR 7.041 iijif

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 2611690

http://www.printingarea.blogspot.com

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

13) TEACHER EDUCATION: ROLE OF NCTE
**Dr. Sarvesh Kumar, Kanpur Nagar** ||68

14) संगीत कला आणि व्यवसाय
**प्रा.डॉ सुनील पारीसे, ता.जि.अकोला** ||74

15) महिमा विठुरायाच्या वारीचा
**डॉ. अनिता देशमुख, वर्धा** ||76

16) महात्मा गांधी : एक विराट मानवतावाद
**डॉ. दिलीप काकडे, जि. गोंदिया** ||82

17) जालना जिल्ह्यातील सिंचन सुविधांचा भौगोलिक अभ्यास
**कायदे सुनिल & डॉ. सांगोळे शिरीष, वाकुळणी** ||85

18) नारायण सुर्वे यांच्या कवितेतील समाजक्रांती
**डॉ. प्रेमा लेकुरवाळे, नागपूर** ||87

19) महाराष्ट्रातील सण उत्सवाचे स्वरुप व प्राचीनता
**डॉ. घनश्याम सुबराव महाडीक, अमरावती** ||91

20) स्वतंत्र मजूर पक्षाचे वर्तमान काळातील महत्व
**प्रा.डॉ. आर. बी. पंडित, जुन्नर** ||96

21) भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याचे मार्ग
**प्रा. डॉ. टी. जी. सिराळ, जि. हिंगोली** ||102

22) भारतीय बालशिक्षण चळवळीतील ताराबाई मोडक यांचे योगदान
**डॉ. श्री. निळकंठ रामचंद्र व्यापारी, जि. ठाणे** ||104

23) सुराज्याची संकल्पना साकारणारे पहिले राजे : छत्रपती शिवाजी महाराज
**डॉ. जयदेवी पवार, ता.जि. लातूर** ||107

24) भारतातील घरकामगारांची चळवळ
**प्रा. डॉ. दत्ता तंगलवाड & प्रा. भारती शंकरराव कोल्हे, ता.जी. बीड** ||110

25) भारत में बौद्ध–धर्म की उत्पत्ति एवं विकास
**डॉ. हर्षिता तिवारी, अल्मोड़ा उत्तराखण्ड** ||112



Scanned by CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal
July To Sept. 2020
Issue-35, Vol-08


14

# संगीत कला आणि व्यवसाय

प्रा.डॉ सुनील पारीसे
संगीत विभाग प्रमुख,
श्री.गणेश कला महाविद्यालय कुंभारी, ता.जि.अकोला

***********

कला आणि व्यवसाय ही दोन्ही वेगवेगळी तत्वे आहे. कलेचे सर्व गुणधर्म संगीताला लागू आहे. संगीताचा व्यवसाय म्हणून विचार करतांना कला व्यवसाय या दोघातील हा मुलभुत फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. कला ही अमृताचा शोध असून तो कधीही न थांबणारी आहे. आणि व्यवसाय हा मुर्ताचा विनियोग आहे. त्याला मर्यादा आहे. त्यात कधीही खंड पडू शकतो कला व व्यवसाय या दोन्ही स्थिरतेच्या वस्तु नाही त्यांना कायमचा एक भरीव आकार देऊ शकत नाही. त्या सतत चालणाऱ्या क्रियाशिल प्रक्रिया आहे. प्रक्रिया करता करता त्या कधीही आकार घेवु शकतात. घेतलेला आकार बदलत किंवा वाढतच जातो एकाच मानसाच्या आयुष्यात हया दोन्ही क्रिया कमीजास्त प्रमाणात चालत राहू शकतात.

संगीताचा कलात्मक दर्जा उंचावण्यासाठी अवितरत साधनेला महत्व देणे आवश्यक आहे. कलात्मक गुणवत्तेचे रसिक श्रोत्याकडून मानपान घेवुन पिढयानपिढया कलावंतांना पुरेल इतक्या बंदिशीचे अमाप भांडार करून ठेवणे आवश्यक असते. घराणेशाहीने गुरू शिष्य पध्दतीला बळकटी आणलेली आहे. एक बंदिश व तिची पेशकारी घराण्याची खासियत राहिली आहे. गुरूने जर हे शिकविले ते हुबेहुब तसेच सादर करण्यात शिष्याचा गौरव होता. अलीकडे घराणे अदूश्य होत असल्यामूळे गुरूशिष्य पध्दतीचे महत्व कमी होवू लागले. या घराणेशाही पध्दतीला आवर बसू लागल्यामुळे त्यामध्ये नवनविन रंग मिसळतांना दिसत आहे. गुरूकडून शिकलेली आणि मेहनतीने घोटलेली बंदिश तीच्या साऱ्या बारीक सारीक गोष्टीसह गळयातून किंवा वाद्यातून सहीसलामत उतरवणे या क्रियेत ग्रहण शक्ती व रियाजातील मेहनत यापैकी कलाकाराचे स्वत:चे काहीही नसते हे सादरीकरण म्हणजे केवळ नक्कल करण्याचा भाग असू शकतो परंतु काही कलाकार केवळ नक्कल करण्यावर समाधन मानत नाही. जे गुरू कडून ग्रहण करतो ते मेहनतीने वारंवार घोटून घोटून ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. आत्मसात करून त्यावर चिंतन करतो आणि स्वत:च्या कल्पना शक्ती व त्याचा विकास करून ते रसिक श्रोत्यासमोर सादर करून त्याला वाहवा मिळवतो आणि तोच कलाकार समाजापुढे येवुन कलात्मकतेचा व्यवसाय करू शकतो.

उत्तम कलाकार कौशल्यवान अध्यापक होवू शकणार नाही. आणि उत्तम कौशल्य असणारा अध्यापक उत्तम कलाकार होवू शकणार नाही. म्हणून काही संगीतनिष्ठ व्यवसायाची चर्चा होणे आवश्यक वाटते. त्यापैकी पिढयानपिढया चालत आलेला व्यवसाय म्हणजे अध्यापन फार प्राचीन काळापासुन हा व्यवसाय सुरू आहे. बदलत्या प्रवाहा प्रमाणे या व्यवसायात विकास झालेला आपण पाहतो. शाळा महाविद्यालयात संगीत विषयाचा समावेश झाल्यामूळे संगीत शिक्षकांना बरीच संधी प्राप्त झालेली आहे. त्याच प्रमाणे खाजगी शिकवणी वर्गांना सुध्दा खूप मोठया प्रमाणात पेव फुटलेला आहे. जिकडे तिकडे संगीताचा प्रसार प्रचार होता नाही दिसत आहे संगीत अध्यापन हा सुध्दा एक उत्तम व्यवसाय झालेला आहे.

संगीत समीक्षा करणे हा एक व्यवसाय होवू शकतो समीक्षा करणारा समीक्षक एखाद्या संस्थेचा आधार घेवून उभा राहू शकतो. याचे कारण असे की, संस्थेकडे आर्थिक पाठबळ असू शकते. हे पाठबळ अभ्यासू वृत्तीच्या स्वरूपात मिळू शकते. म्हणजे कोणत्याही वयात समीक्षक आपण बनू शकतो आपल्या ज्ञानाची पोटली ओळखून आपली निवड होवू शकते. ज्ञानाचा फायदा समीक्षकांना मिळत जातो. वृत्तपत्रिय समीक्षेचा उपयोग कलाकार व रसिकाला जितका होतो तितके महत्व समजून घेतले जात नाही. वृत्तपत्रिय समीक्षा हे कलाकाराच्या दृष्टीने हजारो अथवा



Scanned by CamScanner

लक्षावधी संभाव्य श्रोत्यापर्यंत पोहचविण्याचे साधन असते. एखाद्या मैफिलीला फार तर १०० ते २०० श्रोते उपस्थित असतात. कलाकारांचा कार्यक्रम पसंत पडला तर श्रोत्याकडून होणाऱ्या मौखीक प्रसिध्दीचा फायदा समीक्षकांना मिळत असतो.वृत्तपत्रिय समीक्षेची व्याप्ती फार मोठी असते या माध्यमाने कलाकार घरोघरी पोहोचतो.

रंगमंच निवेदक एक व्यवसाय होऊ शकतो. निवेदकाला उत्तम भाषेचे ज्ञान बोलण्याची शैली बोलण्यातील चढ उतार वारंवार ऐकण्याची उत्तम कस शिकावी लागते. निवेदकाला संगीताच ज्ञान आणि गद्यातील स्वरांचे सामर्थ्य ओळखुन ते वारंवार ऐकावे व शिकाव लागत जी बोली भाषा आपण वापरणार आहोत त्या भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे काही तरी लिहून छापील बोलणे हे फार अवघड होउन जाते त्यामूळे बोलण्यतील रस निघुन जातो ऐकणाऱ्याला रटाळ वाटत असते केवळ वेळ मारून नेण्यासाठी रसिक ऐकत असतात. श्रोत्यांना निवेदन आवडल तर लोक टाळी देतात. पु.ल.देशपांडे, अशोक रानडे, प्रा. शंकर वैध, प्रा.राम शेवाळकर, सुधीर मोघे, सुधीर गाडगीळ, मंगला खांडिलकर अशा व अन्य इतर मान्यवरांनी तनमन एकत्र करून निवेदनाची उत्तम प्रकारे दाद मिळवली आहे. त्याचेच सातत्य म्हणून निवेदनाचा प्रवाह सुरूच आहे. आजही आपण बरेच कार्यक्रम ऐकतो पाहतो त्या कार्यक्रमात धुरंधर निवेदन करणारे निवेदक असतात अर्धा अधिक कार्यक्रमाचा भार निवेदकावर असतो असेही म्हटल्यास वावगे होणार नाही. उत्तम निवेदन करणारा निवेदक पूर्णवेळ व्यवसाची होवू शकतो.

**संदर्भ ग्रंथ**

१. संगीत निबंधावली — श्री.किरण फाटक
२. संगीत शिक्षणाच्या विविध पध्दती — प्र. ना.द.कशाळकर
३. भारतीय संगीत स्वरूप आणि प्रयोजन — कृष्णचंद्र ज्ञाते
४. संगीत कला विहार — अ.भा.गा.मंडळ

❑❑❑



Scanned by CamScanner